माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३५३१/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विठ्ठल बाळकृष्ण लडकत | परवाना निरीक्षक भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका | महापालिका सहाय्यक आयुक्त भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.२५.०८.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये ऑनलाईन तक्रार बंद केल्याची कारणे मिळाली नाहीत, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०१.०४.२०२५ | फायनल प्लॉट २६०/३०१, भवानी पेठ येथील ऑनलाईन तक्रार क्र.WA१४५२४९ या तक्रारीवर केलेल्या कारवाई बाबत सविस्तर माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, " २६० बी माझा आहे, माझी तक्रार बंद केल्याची कारणे उत्तर मिळाले परंतु उशिरा मिळाले." जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " माहिती देऊनच तक्रार बंद केली होती तसे अपिलार्थींना कळविले आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०१.२०२५ च्या पत्राने अपिलार्थी यांना उत्तर दिल्याचे तसेच २९.०१.२०२६ च्या पत्राने अपिलार्थी यांना त्यांनी केलेल्या तक्रारीबाबत वस्तुनिष्ठ माहिती देऊन त्यांची पोहोच प्राप्त केल्याचे दिसून येते. प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /३५३१/२०२५/पुणे 4346/2026 दिनांक - 23/3/26.

रामाआ-पुणे/२०२५/NSB